# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २२३/२०२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर व नाशिक या तिन्ही जिल्हयातील सर्व महाविद्यालयातील ज्या अध्यापकांनी दि. ११ जुलै, २००९ पूर्वी एम. फिल. पदवी पूर्ण केलेली आहे आणि दि. १४ जून, २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरूपी सेवेत असलेल्या अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे दि. ०२ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये नेट मधून सूट देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांनी त्यांचे दि. १८ जुलै, २०२५ च्या पत्रान्वये आवश्यक ती कार्यवाही करून त्याचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविलेले आहे. त्यास अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाने ज्या अध्यापकांना नेट मधून सूट दिलेली आहे अशा अध्यापकांनी त्यांची कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी त्यांच्या टिचर प्रोफाईलमधून स्टेज १ ते २, स्टेज २ ते ३, स्टेज ३ ते ४, व स्टेज ४ ते ५ साठी अर्जाची नोंदणी दि. २३ ऑगस्ट, २०२५ ते दि. २८ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत आणि त्यानंतर आपल्या महाविद्यालयाच्या बीओडी लॉगिनमधून आपली नोंदणी करण्याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक २१४/२०२५, दि. २२ ऑगस्ट, २०२५ अन्वये कळविण्यात आलेले होते.

तथापि, बऱ्याचशा अध्यापकांनी कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठीच्या अर्जाची नोंदणी केलेली नसल्याने विविध संघटनांनी उक्त परिपत्रकास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यास अनुसरून ज्या अध्यापकांनी अद्यापही नोंदणी केलेली नाही अशा अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी त्यांच्या टिचर प्रोफाईलमधून स्टेज १ ते २, स्टेज २ ते ३, स्टेज ३ ते ४, व स्टेज ४ ते ५ साठी अर्जाची नोंदणी करण्यासाठी दि. २९ ऑगस्ट, २०२५ ते दि. ०१ सप्टेंबर, २०२५ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे

सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रकातील आशय संबंधित अध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावा.

**How to Apply :**

**Step 1:- Teacher BOD Login → Profile → M.Phil CAS Request**
**Step 2:- College BOD Login → Approval Online → Approve M.Phil CAS Request**

28/8/2025

जावक क्र. सीसीओ/३५२३
दिनांक – २८ ऑगस्ट, २०२५

(स. द. डावखर)
उपकुलसचिव